

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

विद्वान् सर्वत्र पूज्यते
स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine March 2024 - Pages - 52**

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे    कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७५ * अंक ५ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-





अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय आणि जी. के. पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे ९ येथे
दि. १ फेब्रुवारी २०२४ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण कार्यक्रम प्रसंगी
प्रमुख पाहुणे ख्यातनाम वक्ते, लेखक आणि तज्ज्ञ डॉ. अच्युत गोडबोले
यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत डावीकडून उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे,
कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मसाळ आणि संचालक श्री. सुनील रेडेकर

## ❊ अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि जी. के. पाटे वाणी व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे ९ ❊



प्रमुख पाहुणे डॉ. अच्युत गोडबोले यांच्या हस्ते 'रणसंग्राम कप' स्वीकारताना वार्षिक क्रीडा स्पर्धांमधील विजेते विद्यार्थी, समवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे

वार्षिक स्नेहसंमेलन 'समसारा २४' चे उद्घाटन प्रसंगी दीपप्रज्वलन करताना संचालक श्री.सुनील रेडेकर, समवेत संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, प्रा. सुनील गायकवाड आणि 'समसारा २४' समितीचे विद्यार्थी सदस्य







'फ्युचर चिड्रन इंडिया ऑर्गनायझेशन' तर्फे महाविद्यालयातील १६ विद्यार्थ्यांना शैक्षिक फी भरण्यासाठी प्रत्येकी रु. ८०,०००/- ची आर्थिक मदत देण्यात आली. याप्रसंगी उपस्थित डावीकडून प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर व श्री. सुनील रेडेकर, श्री. गंगाधर सोनावणे, सौ. साधना बोकील, प्रा. सौ. प्रिती खत्री व शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थी आणि विद्यार्थिनी

संपादकीय

# शुभास्ते पंथानः ।

साधारणतः इंग्रजी नववर्ष सुरु झाले की, विशेषतः ज्या पालकांची मुले इयत्ता दहावी किंवा बारावी मध्ये असतात त्यांना फेब्रुवारी आणि मार्चचे वेध लागतात. 'रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग' अशी त्या त्या घरातील मंडळींची अवस्था होते. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे, आजच्या घडीला इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांना विद्यार्थी आणि समाज जीवनात एक अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. आपल्या पाल्याच्या भावी जीवनाची दिशा ठरविणारा एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून या परीक्षांकडे पाहिले जाते.

याच काळात इतरही शालेय आणि महाविद्यालयीन परीक्षांचा काळ सुरु होतो. सर्व परीक्षार्थी आणि त्यांच्या परिवारजनांना परीक्षेतील उज्ज्वल यशासाठी अनेकानेक शुभेच्छा ! तुम्हा सर्व परीक्षार्थिंना उत्तम यश लाभो ही परमेश्वरचरणी प्रार्थना.

विद्यार्थीमित्रहो, दरवर्षी एकएक इयत्ता ओलांडत असताना तुमच्या डोळ्यांसमोर अनेक स्वप्न उमलत असतील. तुमची ती सारी स्वप्ने साकार होऊ देत अशी माझी मनापासून इच्छा आहे.

विशेषतः ज्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीतील शालान्तादी अंतिम टप्प्याच्या ज्या परीक्षा आहेत त्या परीक्षांना सामोरे जाताना तुमच्या सर्वांच्या मनात एक अनामिक आणि अबोध हुरहूर असेल कारण, तुमच्या जीवनातील एक पर्व आता संपणार आहे आणि आता तुम्ही एका नव्या विस्तीर्ण स्पर्धा क्षेत्रात प्रवेश करणार आहात. कोणत्याही नवीन ठिकाणी पहिले पाऊल टाकताना मन जरा कचरतच असते. अनोळखी जग कसे असेल ? या नव्या विश्वातल्या कटोकटीच्या स्पर्धेत आपण पुरे पडू शकू का ?

जीवनात अज्ञात क्षेत्रात पाऊल टाकताना भूतकाळाचे बंध सोडावे आणि तोडावे लागत असल्याने जीवाची घालमेल ही होतेच होते. एका सुरक्षित जगातून आपण एका अनोख्या जीवन प्रवासास प्रारंभ करीत आहोत या जाणिवेने प्रत्येकाच्या मनात एक हुरहूर दाटून येतेच येते पण, विद्यार्थीमित्रहो एक लक्षात ठेवा की, परिवर्तन हाच जीवनाचा स्थायीभाव आहे. आपण जीवनरूपी समरांगणातील एक सैनिक आहोत आणि 'सदैव सैनिका पुढेच जायचे', हा सैनिकी जीवनाचा मूलमंत्र असतो. 'दुरून डोंगर साजरे' या न्यायाने महाविद्यालयीन जगाचे किंवा महाविद्यालयाबाहेरचे एक सुंदर गुलाबी चित्र तुम्हाला मोहवत असेल पण, माझ्या विद्यार्थी मित्रांनो, एक गोष्ट लक्षात ठेवा की, माणूस हा आजन्म विद्यार्थी असतो आणि 'सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम् ।'

हे विद्यार्थी जीवनाचे मूलतत्त्व असते. तुम्ही या विद्यार्थी दशेच्या काळात अधिकाधिक चांगली विद्या प्राप्त करण्यासाठी कसून प्रयत्न करा. सदैव लक्षात ठेवा की, विद्यार्थी दशेत जो उपभोगांच्या, इंद्रियसुखांच्या मागे लागतो त्याला विद्याप्राप्ती होत नसते. विद्याप्राप्तीसाठीचा एक राजमार्ग सांगितला जातो की, तुम्ही ज्या इयत्तेत असाल, कमीतकमी तितके तास रोजच्या रोज अभ्यास करा. एवढ्या कळकळीने जर, अभ्यास केला तर, निश्चितच यश:प्राप्ती होते. या जिद्दीने आणि चिकाटीने जीवनातील नवनवीन आव्हानांना सामोरे जा.

आपल्या भावी जीवनाविषयीची तुमची जी जी स्वप्ने आहेत ती ती सारी साकार होऊ देत. त्या स्वप्नपूर्तीच्या ध्येयाकडे तुमची वाटचाल यशस्वीपणे होऊ दे. स्वप्नपूर्तीच्या मार्गात आपल्या पायाखाली सदैव मऊ मखमली गालीचेच असावेत असे प्रत्येकाला वाटत असते पण, वास्तवात तसे होईलच असे नसते. जीवनातील कटू अनुभवाला सामोरे जाताना तुम्ही भांबावून जाऊ नका किंवा दुःखी, निराश आणि हताश होऊ नका. जीवनात सुखदुःख, आशानिराशेचा लपंडाव हा सदैव चालूच असतो. दिवसामागून रात्र येते आणि रात्रीमागून दिवस हा येतोच येतो. त्याचप्रमाणे मानवी जीवनात यशापयश असते. सापशिडीच्या खेळात आपल्याला अचानकपणे चांगले दान पडते आणि आपण शिडी चढून एकदम बरीच घरे ओलांडतो तर, कधी असे विचित्र दान पडते की, आपण सर्वोच्च स्थानी असूनही सापावरून एकदम तळाला जातो पण, खेळातल्या या हारजितीने आपण खेळ सोडत नाही तर आनंदाने, खिलाडूवृत्तीने त्याचा स्वीकार करतो आणि पुन्हा एकदा नव्या जोमाने खेळात सामील होतो. तीच खिलाडूवृत्ती या जीवनखेळाला सामोरे जाताना प्रत्येकाने जोपासली पाहिजे. ध्येयसिध्दीकडे वाटचाल करताना अडचणींचा बाऊ करू नका. एखाद्या यशाने हुरळून जाऊ नका तसेच एखाद्या अपयशाने खचूनही जाऊ नका. कारण जीवनध्येय हे तुमचे आणि तुम्हीच ठरवलेले असते.

**‘पदोपदी पसरून निखारे आपुल्याच हाती,**
**होऊनिया बेहोष धावलो ध्येयपथावरती,**
**कधि न थांबलो विश्रांतीस्तव पाहिले न मागे,**
**बांधू न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे,**
**एकच तारा समोर होता पायतळी अंगार’**

या मनोभूमिकेतून भावी जीवनाला सोमोर जा. निश्चितच उद्याचे जग तुमचेच आहे याबद्दल मला पूर्णतः खात्री आहे.

आपण जीवनात यशस्वी व्हा. विद्यावान् व्हा. स्वतःच्या आणि संपूर्ण मानवजातीच्या उन्नतीसाठी कार्य करा. त्यासाठी,

**उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत ।**

हा स्वामी विवेकानंदांनी सांगितलेला कठोपनिषदातील ज्ञानतपस्येचा मूलमंत्र सदैव लक्षात ठेवा. उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्तीपर्यंत थांबू नका. आळसाचा त्याग करुन श्रेष्ठ ज्ञानियांकडून ज्ञान मिळवा. त्यांच्याकडून आत्मज्ञानाची प्राप्ती करुन घ्या आणि आत्मोन्नती साधा. निरलसपणे प्राप्त कर्तव्याला सामोरे जात निष्काम आणि स्थितप्रज्ञ वृत्तीने उद्याच्या जीवनाला सामोरे जा.

**यशस्वी भव । शुभास्ते पंथानः ।**

दि. २७ फेब्रुवारी २०२४
**मराठी भाषा गौरव दिन**

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

## शुभेच्छा समारंभ

शनिवार दि. १० फेब्रुवारी २०२४ रोजी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य वि. पां. गावडे हे होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रशालेचे माजी विद्यार्थी ॲडव्होकेट श्री. अमर निकम हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अतिथी आणि प्रशालेतील इ. १० वी च्या विद्यार्थ्यांचे स्वागत अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने यांनी करून दिला. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन करण्यात आला. विद्यार्थी कु. अभिजित भंडारी, कु. ओम मोरे, कु. जयदीप सवासे, कु. साहिल ढमढेरे, इ. १० वी यांनी मनोगत व्यक्त केले. कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, ॲडव्होकेट श्री. अमर निकम, प्राचार्य वि. पां. गावडे आणि अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. ॲडव्होकेट श्री. अमर निकम यांच्या हस्ते व कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, प्राचार्य वि. पां. गावडे, शिक्षक या सर्वांच्या हस्ते प्रशालेतील इ. १० वी चे विद्यार्थी व बी. एड. छात्र अध्यापकांना लेखन पॅड, पेन, पट्टी भेट म्हणून देण्यात आले. या कार्यक्रमासाठी सुंदर फलक लेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी प्रशालेतील विद्यार्थिनींनी सुंदर रांगोळी काढली होती. आभार प्रदर्शन अध्यापक श्री. प्रशांत बोंबलट यांनी केले. या प्रसंगी शिक्षण, शिक्षकेतर सेवक, काही माजी विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी सर्वांना अल्पोपहार देण्यात आला. कार्यक्रमाची सांगता अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे यांनी गायलेल्या पसायदानाने झाली.

## शिवजयंती


छत्रपती शिवाजी महाराज

सोमवार दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यालयातील इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी ढोल, ताशांच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची पालखीतून वाजत गाजत घोषणा देत मिरवणूक काढली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व्याख्याते श्री. युवराज गटकळ आणि संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांच्या हस्ते श्री. युवराज गटकळ यांचा सत्कार पुस्तक व गुलाबपुष्प देऊन करण्यात आला. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे आणि श्री. रमेश कुलकर्णी यांचा सत्कार प्राचार्य वि. पां. गावडे यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. या प्रसंगी इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी पोवाडा, महाराष्ट्र राज्य गीत, नृत्य, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याबद्दल भाषण सादर केले. यानंतर प्रमुख पाहुणे श्री. युवराज गटकळ आणि संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. एड्. छात्र अध्यापक श्री. गणेश तांबे यांनी केले. फलकलेखन बी. एड्. छात्र अध्यापिका श्रावणी गोरे यांनी केले. अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी आभारप्रदर्शन केले.

***

# महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**

**प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्ही. शिंदे**

### हिवाळी परीक्षा २०२३ निकाल

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या हिवाळी परीक्षा २०२३ चा निकाल नुकताच जाहिर झाला.

| वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | शेकडा गुण | क्रमांक |
|---|---|---|---|
| प्रथम | कु. आर्यन अकोले | ७५.०० | प्रथम |
| | कु. संकेत इंगोले | ६८.०० | द्वितीय |
| | कु. विक्रांत माने | ६६.१२ | तृतीय |
| द्वितीय | कु. उज्वल शर्मा | ८४.२९ | प्रथम |
| | कु. रितु बोराटे | ८२.७१ | द्वितीय |
| | कु. मोनाली काळे | ८२.४३ | तृतीय |
| तृतीय | कु. सौरव वानखेडे | ९०.२९ | प्रथम |
| | कु. प्राजक्ता निकम | ८६.८६ | द्वितीय |
| | कु. वैभव लिंगशेट्टी | ८६.८६ | द्वितीय |
| | कु. साक्षी सोनावणे | ८६.२९ | तृतीय |

### मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

दि. १४ ते २८ जानेवारी २०२४ या दरम्यान मराठी भाषा पंधरवडा साजरा करण्यात आला. या निमित्त विद्यार्थ्यांसाठी डॉ. ज्ञानेश्वर दाते यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेची महती, भाषेचा इतिहास, उपलब्ध साहित्य, मराठी नाटके, चित्रपट यांची माहिती दिली. मराठी भाषेचे संवर्धन हि काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. या व्याख्यानाचे संयोजन प्रा. राजेश जाधव यांनी केले.

### प्रिंट समिट २०२४

बॉम्बे मास्टर प्रिंटर्स असोसिएशन (BMPA) यांच्या मार्फत समिट २०२४ चे आयोजन टाटा थिएटर येथे करण्यात आले होते. यामध्ये प्र. प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे, प्रा. श्री. अक्षय रावेतकर, प्रा. श्री. राजेश जाधव, श्री. आशिष गजभिये व विद्यार्थी सहभागी झाले होते. मुद्रण क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले.

### प्रिंट ऑलिंपियाड २०२४

ऑफसेट प्रिंटर्स असोसिएशन, लुधियाना पंजाब यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या प्रिंट ऑलिंपियाड २०२४ मध्ये संस्थेतील खालील चार विद्यार्थ्यांची पश्चिम विभाग प्रथम फेरी मध्ये निवड करण्यात आली.

कु. समाधान बाविस्कर — कु. ऋतुजा भाले

कु. वैभव लिंगशेट्टी — कु. मोहित कटियाल

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !**

### पुणे विभागीय क्रीडा स्पर्धा

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या मार्फत शासकीय तंत्र निकेतन, कराड येथे शासकीय अनुदानित विभागातील शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांच्यासाठी रोजच्या कामाच्या तणावामधून मुक्ती, तसेच शारिरीक व मानसिक तंदुरुस्ती वाढावी, संघ भावना वृद्धींगत व्हावी या साठी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

संस्थेच्या अनुदानित विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांनी क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुध्दिबळ, कॅरम, धावणे इ. क्रीडा प्रकारात सहभाग घेतला.

### अतिथी व्याख्यान

संस्थेतील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी प्रा. रविकांत आदरकर यांचे प्रोफेशनल कम्युनिकेशन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रा. रविकांत यांनी विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊन विविध उपक्रमाद्वारे कम्युनिकेशन या विषयाचे महत्त्व समजावून सांगितले. सदर व्याख्यानाचे संयोजन प्रा. सौ. नेहा कुलकर्णी यांनी केले.

### बँक नोट प्रेस, देवास, मध्यप्रदेश

डिसेंबर २०२३ मध्ये जाहिर झालेल्या निकालानुसार संस्थेच्या डिप्लोमा इन प्रिंटिंग

टेक्नॉलॉजी उत्तीर्ण झालेल्या खालील माजी विद्यार्थ्यांची निवड बँक नोट प्रेस, देवास, मध्यप्रदेश येथे झाली.

**ज्युनियर टेक्निशियन कंट्रोल**

१) कु. पवन बळीराम भोंबे ३) कु. सुशांत संजय देवरे
२) कु. प्रथमेश सतिश डमरे

**ज्युनियर टेक्निशियन प्रिंटिंग**

१) कु. अक्षयराम वेंकटकुमार थुमु

**भारत प्रतिभूति मुद्रणालय, नाशिक रोड**

नोव्हेंबर २०२३ मध्ये जाहिर झालेल्या निकालानुसार डिप्लोमा इन प्रिंटिंग टेक्नॉलॉजी उत्तीर्ण झालेल्या खालील माजी विद्यार्थ्यांची निवड भारत प्रतिभूति मुद्रणालय, नाशिक रोड येथे झाली.

**ज्युनियर टेक्निशियन (टेक्निकल)**

१) कु. पवन काळे २) कु. दिक्षांत रोकडे

**ज्युनियर टेक्निशियन (कंट्रोल)**

१) कु. संचित वालगुडे २) कु. पल्लवी पवार

**निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !** ***

## महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

### हिवाळी परिक्षा २०२३ निकाल

**प्रथम वर्ष**



कु. आर्यन अकोले
प्रथम - ७५.००%



कु. संकेत इंगोले
द्वितीय - ६८.००%



कु. विक्रांत माने
तृतीय - ६६.१२%

**द्वितीय वर्ष**



कु. उज्वल शर्मा
प्रथम - ८४.२९%



कु. रितु बोराटे
द्वितीय - ८२.७१%



कु. मोनाली काळे
तृतीय - ८२.४३%

**तृतीय वर्ष**



कु. सौरव वानखेडे
प्रथम - ९०.२९%



कु. प्राजक्ता निकम
द्वितीय - ८६.८६%



कु. वैभव लिंगशेट्टी
द्वितीय - ८६.८६%



कु. साक्षी सोनावणे
तृतीय - ८६.२९%

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी**
**मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

**समूहगीत गायन कार्यक्रम**

दि. २५ जानेवारी २०२४ रोजी झेप या सामजिक संस्थेच्यावतीने ए.पी.पी. विद्यालय पंचवटी नाशिक येथे आयोजित ''जागवूया देशाभिमान गाऊन राष्ट्रभक्तीपर गीतगायन'' या कार्यक्रमात विद्यालयात सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमात २१००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन गीतगायन केले.

**प्रजासत्ताक दिन**

७५वा प्रजासत्ताक दिन विद्यालयात उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक श्री. अमोल जोशी यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी संचालक श्री. अमोल जोशी यांचे स्वागत आणि सत्कार केला. श्री. गौरव झुरडे यांनी इ. १०वीच्या विद्यार्थ्यांना ''कॉपीमुक्त अभियान गैरमार्गाशी लढा'' प्रतिज्ञा दिली. इयत्ता नववी - दहावी च्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीताचे सादरीकरण केले. संचालक श्री. अमोल जोशी यांनी ''तीर्थरूप नाशिक'' या हस्तलिखित अंकाचे प्रकाशन केले. हस्तलिखित लेखन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, संस्था कर्मचारी, सर्व विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते. सौ. तेजश्री जोशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. श्रीमती ठाकरे सुनंदा यांनी आभार मानले. सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

**तिळगुळ समारंभ**

दि. १२ जानेवारी २०२४ रोजी तिळगुळ समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. शिक्षिका सौ. अस्मिता बावधनकर यांनी संक्रांतीचे धार्मिक, भौगोलिक, सामाजिक महत्त्व सांगितले. संक्रांतीविषयीच्या पौराणिक, अध्यात्मिक कथा सांगितल्या. भारतातील विविध भागात संक्रांत सण कसा साजरा केला जातो, याविषयी अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी सर्व विद्यार्थ्यांना तिळगुळ वाटप केले आणि मतभेद विसरून सर्वांशी प्रेमाने वागावे असे सांगितले. सौ तेजश्री जोशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार मानले .

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ**

दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, विशेष अतिथी उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम, जिर्गे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, संचालक श्री. सुनील रेडेकर व श्री. अमोल जोशी उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन आणि सरस्वतीपूजन करण्यात आले. स्वागतगीताने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. संचालक श्री. अमोल जोशी यांनी सर्व मान्यवरांचा परिचय करून दिला आणि सर्व प्रमुख अतिथीचे स्वागत आणि सत्कार केला.

श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. मान्यवरांच्या हस्ते बक्षिसपात्र विद्यार्थांना पारितोषिक देऊन सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना 'आजच्यापेक्षा उद्या आणखी चांगले काम होण्यासाठी प्रयत्न करावे' असे सांगितले. संचालक श्री. सुनील रेडेकर यांनी विद्यार्थ्यांना आपले ध्येय ठरवून वाटचाल करावी असे सांगितले. अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांशी संवाद

साधून शिक्षणाचे महत्त्व सांगितले. 'परिस्थितीमुळे शिक्षण थांबले नाही पाहिजे' असे प्रेरणादायी विचार मांडले. माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम आणि द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या झालेले विद्यार्थी अनुक्रमे चि. प्रतिक निवृत्ती गव्हाणे, चि. हर्षद शिवशंकर पाटील यांना प्रत्येकी रोख रुपये ५००/- बक्षीस दिले. सौ. अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले. सौ. तेजश्री जोशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**शिवजयंती**

दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकांनी शिवरायांचे प्रतिमापूजन करून अभिवादन केले. इ. ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग कथन, पोवाडे, गीत सादरीकरण केले. शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी विविध प्रसंगातून शिवरायांच्या पराक्रमाची माहिती सांगितली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी शिवजन्मापूर्वीची महाराष्ट्रातील परिस्थिती सांगितली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी केले. श्रीमती अर्चना केकाण यांनी आभार मानले.

**क्रीडा साहित्य वाटप**

दि. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी 'उम्मीद फाउंडेशन' तर्फे विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्य वाटप करण्यात आले. उम्मीद फाउंडेशनचे श्री. चेतन बाघमार, श्री. पियुष बाघमार, डॉ. आनंद बेदमुथा, ॲडव्होकेट आनंद पिपाडा, श्री. प्रदीप बुरड उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संचालक श्री. अमोल जोशी हे होते. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. श्री. चेतन बाघमार यांनी उम्मीद फाउंडेशनच्या कामाची माहिती सांगितली. ''जीवनात आपले आई-वडील आणि गुरु यांना कधीही विसरू नका'' असे सांगितले. संचालक श्री. अमोल जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यालयास देणगी रुपात क्रिकेट सेट, बॅडमिंटन सेट, ३५ लेझीम, फुटबॉल, चार ढाली इत्यादी साहित्य देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले.

**देणगीवृत्त**

दि.१३ फेब्रुवारी २०२४ रोजी 'इनर व्हील क्लब ऑफ नाशिक' यांनी इ. ५वी ते १०वी च्या एकूण २७ विद्यार्थ्यांना देणगीदार इंदुमती मेहता यांचेवतीने स्वेटर वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास इनर व्हील क्लब च्या प्रेसिडेंट सरोज दशपुते आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

**पुणे विद्यार्थी गृह संस्था आणि विद्यालयाचे वतीने इनर व्हील क्लब चे मनःपूर्वक आभार !**

**मान्यवरांच्या भेटी**

दि. २९ जानेवारी २०२४ रोजी एन.सी.इ.आर.टी या संस्थेच्या प्राध्यापिका सौ. रश्मी शर्मा आणि त्यांचे सहकारी विद्यालयास भेट दिली आणि इ. ९वी व १०वी च्या विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली सोडवून घेतली.

**अध्ययन प्रकीयेचे व्यवस्थापन**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत आयोजित अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन मनपा स्तरीय प्रशिक्षण इ. ५वी ते ८वी विविध टप्प्यात आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणास सौ. तेजश्री जोशी, श्रीमती अर्चना केकाण श्री. तुकाराम मंडले, श्री. गौरव झुरडे या शिक्षक वृंदांनी प्रशिक्षण घेतले.

***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

### नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

दि. २३ जानेवारी २०२४ नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी करण्यात आली. नेताजींच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. शिक्षिका सौ. रत्ना गोसावी यांनी विद्यार्थ्यांना नेताजींच्या स्वातंत्र्य लढ्याची माहिती सांगितली.

### देशभक्तीपर गीत सादरीकरण

'झेप फाउंडेशन सांस्कृतिक कला मंडळा'तर्फे देशभक्तीपर समूह गानाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत आपल्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमात ५१ शाळांच्या एकूण २५००० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

### प्रजासत्ताक दिन

दि. २६ जानेवारी २०२४ शाळेत ७५ वा प्रजासत्ताक दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी सर्व शाखांचे प्राचार्य व प्रमुख उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी ध्वजाला सलामी देत राष्ट्रगीत व झेंडागीत म्हटले. इ ८ वी आणि ९ वी च्या विद्यार्थ्यांनी परेड करत राष्ट्रीय ध्वजाला सलामी दिली. विद्यार्थी कु. अद्वैत वडजे व कु. पलक पाटील इ ४ थी यांनी त्यांचे विचार मांडले. बी.एड च्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सौ. वैशाली गाजरे आणि विद्यार्थिनी कु. स्वरांगी वडजे आणि कु. रिया तेलुरे, इ. ९ वी यांनी केले. या कार्यक्रमास अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, बी. एड. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जी. वाकचौरे, मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य व श्रीमती भारती पाटील, सर्व शाखांचे शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### लाला लजपतराय जयंती

दि. २८ जानेवारी २०२४ रोजी लाला लजपतराय जयंती साजरी करण्यात आली. शिक्षिका सौ. नेहा कडलग यांनी त्यांच्या कार्याची माहिती सांगितली.

### हुतात्मा दिन

दि. ३० जानेवारी २०२४ रोजी हुतात्मा दिनानिमित्त देशाचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वहाण्यात आली. विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची माहिती सांगितली.

### वार्षिक स्नेहसंमेलन

दि. ३० जानेवारी २०२४ रोजी प्राथमिक विभागाचे स्नेह संमेलन उत्साहात पार पडले. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक श्री. अमोल जोशी, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, बी एड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जी. वाकचौरे, तसेच पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षा सौ. सुरेखा दिवेकर यांचे स्वागत केले.

शाळेतील गुणवंत विद्यार्थी व क्रीडा स्पर्धेत प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी पुणे विद्यार्थी गृहाचा संपन्न वारसा मोजक्या व मार्मिक शब्दात कथन केला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक व शिक्षक यांना मार्गदर्शन केले.

स्नेह संमेलनाची सुरुवात इ ७ वी च्या जय श्रीराम या गाण्याने झाली. विविध प्रकारचे नृत्याविष्कार विद्यार्थ्यांनी सादर केले. शिक्षिका सौ. वैशाली मुंदाणकर, सौ. रत्ना गोसावी, सौ. माधुरी गवळी यांनी व शाळेच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**अभिनंदनीय**

* दि. २५ जानेवारी २०२४ रोजी आयोजित ॲबेकस प्रोॲक्टीव स्पर्धेत विद्यार्थिनी कु. आर्या मंडलिक इ. ५ वी हिने प्रथम क्रमांक आणि कु. आराध्या दिवेकर इ. ४ थी हिने १४ वा क्रमांक प्राप्त केला. या विद्यार्थिनींना ट्रॉफी व सायकल बक्षीस म्हणून मिळाले.

* जानेवारी २०२४ मध्ये शाळेत कलाविकास संस्थेतर्फे रंगबहार राज्यस्तरीय आणि हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत २३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी १६ विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र मिळाले. विद्यार्थिनी कु. तनुश्री गिरी हिला प्रथम क्रमांकाची ट्रॉफी व रोख रु. ४,०००/- बक्षीस मिळाले. इतर विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे -

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. पलक सम्राट आमले | १ ली |
| कु. अर्चित रवींद्र देशमुख | १ ली |
| कु. रिद्धी हिरामण वाघ | १ ली |
| कु. ऋषभ गव्हाळे | २ री |
| कु. गार्गी धुळे | २ री |
| कु. ह. रा. पवार | २ री |
| कु. हेतवी गिरीधर शेवाल | ३ री |
| कु. चंचल विजय महाजन | ३ री |
| कु. प्राची रविंद्र वाघेरे | ३ री |
| कु. काव्या राजेश शहा | ४ थी |
| कु. पंखुडी दीपक गोसावी | ४ थी |
| कु. जान्हवी रविंद्र चौरे | ५ वी |
| कु. आर्या सचिन जाधव | ५ वी |
| कु. आराध्या दिगंबर बोटवे | ६ वी |

**इ ७ वी एलिमेंटरी चित्रकला परीक्षा**

इ. ७ वी च्या विद्यार्थी महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळा तर्फे घेण्यात येणाऱ्या एलिमेंटरी परीक्षेत खालील विद्यार्थी अ श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्यांची नावे खालीलप्रमाणे :-

| विद्यार्थ्यांचे नाव | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|
| कु. संजीवनी खलाणे | कु. चारू राउत |
| कु. पूर्वी गोरे | कु प्राची चिमणकारे |
| कु. संजना ढोले | कु. श्लोक राव |
| कु. भार्गवी कुलकर्णी | कु. हंसिका चौधरी |
| कु. निष्ठा मुद्गल | कु.वृंदा कोकाटे |
| कु. अनघा संकोपाल | कु. धनश्री पवार |

**नाशिक लिटील चॅम्प**

नाशिक लिटील चॅम्प आयोजित विविध स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांचा सत्कार करण्यात आला. चित्रकला स्पर्धेचे विजेते खालीलप्रमाणे :-

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. आद्या वाघमारे | ५ वी |
| कु. विराज लोणारे | १ ली |
| कु. समृद्धी सोनवणे | ५ वी |
| कु. वृषभ गव्हाळे | २ री |
| कु. आमले पालक | १ ली |
| कु. फडोळ अनुष्का | ७ वी |
| कु. कृष्ण फडोळ | ३ री |

**शिवजयंती**

दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी शिवजयंती साजरी करण्यात आली. महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिक्षिका सौ. रश्मी कडलग यांनी शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती सांगितली. विद्यार्थी कु. रुद्र घरटे, इ. ५ वी व विद्यार्थिनी कु. मृण्मल मोरे इ. ४ थी यांनी त्यांच्या कार्याची माहिती सांगितली. इ १ ली आणि २ री चे विद्यार्थी शिवाजी महाराजांची वेशभूषा करून आले होते. ***

## विद्याभवन-घाटकोपर, मुंबई शाखा

## पुणे विद्यार्थी गृहाची मुंबई शाखा विद्याभवन – घाटकोपर

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**२६ जानेवारी २०२४**

दि. २६ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ७.३० वाजता प्रमुख पाहुण्या श्रीमती अनुराधा मेहेंदळे (इंग्रजी माध्यमिक विभागाच्या माजी मुख्याध्यापिका) यांच्या हस्ते ध्वजारोहण दिमाखात पार पडले. मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते तसेच भाषणे सादर केली.

त्यांनतर मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्या श्रीमती अनुराधा मेहेंदळे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्रमुख पाहुण्या श्रीमती अनुराधा मेहेंदळे यांच्या हस्ते माजी विद्यार्थी कै. ज. शां. वैदय पुरस्कृत 'आदर्श शिक्षक पुरस्कार कनिष्ठ महाविद्यालयाचे सहा. शिक्षक श्री. विवेक चौधरी यांना देण्यात आला. तसेच श्री. तुकाराम मोहिते पुरस्कृत 'आदर्श शिक्षक पुरस्कार' माध्यमिक मराठी विभागाच्या सहा. शिक्षिका श्रीमती संगीता साळी यांना देण्यात आला. श्री. शरदचंद्र रामचंद्र खेर पुरस्कृत पुरस्कार पूर्व प्राथमिक मराठी विभागाच्या सहा. शिक्षिका श्रीमती नेहा कर्णिक यांना देण्यात आला.

तसेच बेस्ट कॅडेट पुरस्कार मरठी माध्यमाच्या इ. १०वी च्या परी इंदलकर व अविष्कार शिंदे व इंग्रजी माध्यमाच्या श्लोक परब व हर्षाली भालेराव यांना देण्यात आला. त्यांनतर प्रमुख पाहुण्या श्रीमती अनुराधा मेहेंदळे व व्यासपीठावरील इतर मान्यवरांच्या हस्ते माध्यमिक शालांत परीक्षेत ९०% वरील गुणप्राप्त विद्यार्थी यांचा पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या संविधानाची सांगड श्री राम प्रतिष्ठापनेशी घालून स्वातंत्र्य समता, बंधुता याचे महत्त्व विशद केले. संविधानातील मूल्ये फक्त ऐकीव व वाचनीय नसावीत तर ती अंगीकृत करावी. तसेच छोटया-छोटया कथांमधून देशाचा विकास साधण्यासाठी स्वतःपासूनच सुरुवात करावी असे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले तर श्री. अंकुश कारंडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी व इंग्रजी विभाग,

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**पर्यवेक्षिका : सौ. सिध्दी साळवी (सेमी इंग्रजी), पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ**

दि. ३.२.२०२४ रोजी विद्याभवनच्या मैदानावर पूर्व प्राथमिक विभागाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, विशेष अतिथी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे व इतर मान्यवर उपस्थित होते. पाहुण्यांचा हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पूर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले.

श्रीमती सिध्दी साळवी यांनी आपल्या प्रास्ताविकमध्ये संस्थेच्या किती व कुठे-कुठे शाखा आहेत, तसेच आपली संस्था किती जोमाने विकसित झाली आहे, याची माहिती दिली. श्रीमती पूजा फरिया यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. कार्याध्यक्ष

श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे व विशेष अतिथी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचाही पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. श्रीमती स्नेहल थोरात व श्रीमती पायल शाह यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. प्रमुख पाहुणे श्री. एस. एम. जिर्गे यांनी मुलांचे बालपण जपा व त्यांना शारीरिक खेळ का खेळले पाहिजे या विषयी छान संदेश दिला. तसेच विशेष अतिथी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनीही सर्वांना मोलाचे मार्गदर्शन केले.

पारितोषिकांची यादी वाचन श्रीमती प्रणिती सावंत, श्रीमती गौतमी गोखले व श्रीमती पूजा कीर्ती यांनी केले. प्रमुख पाहुणे व इतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सोनाली ढेरंगे व श्रीमती रुजुता पाध्ये यांनी केले. श्रीमती नयना बढे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### वार्षिक सहल

दरवर्षीप्रमाणे या वर्षी दि. १५.०२.२०२४ रोजी पूर्व प्राथमिक विभागाची शैक्षणिक सहल टिकुजिनी वाडी, ठाणे येथे नेण्यात आली. शैक्षणिक वर्षातील एक अत्यंत आनंदी व महत्वाची गोष्ट म्हणजे सहल. टिकुजिनी वाडीला पोहचताच उत्तम अल्पोपहाराची विद्यार्थ्यांनी चव घेतली. विविध खेळ व वेगवेगळया राईड्सचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. तसेच दुपारच्या जेवणाचा ही त्यांनी आस्वाद घेतला. शेवटी निघताना सर्व विद्यार्थ्यांना आईस्क्रीम देण्यात आले. शाळेत पोहचल्यावर दमलेली मुले आई-वडिलांना बघून आनंदी झाली.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**

### माजी विद्यार्थी मंडळ हस्ताक्षर स्पर्धा २०२३-२४

दि. २३ जानेवारी २०२४ रोजी माजी विद्यार्थी मंडळ आयोजित इ. १ली ते ४थी ची हस्ताक्षर शुध्दलेखन स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी बक्षिसे पटकावली :

| इयत्ता | क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे |
|---|---|---|
| १ ली | प्रथम | कु. शरयु शशिकांत पोखरकर |
| | द्वितीय | कु. आराध्या परेश कदम |
| | तृतीय | कु. आराध्या योगेश तांबोळी |
| २ री | प्रथम | कु. यशस्वी रविंद्र पाटील |
| | द्वितीय | कु. कस्तुरी विजय बोऱ्हाडे |
| | तृतीय | कु. सानवी सचिन विचारे |
| ३री | प्रथम | कु. अनिश पंकज वाघ |
| | द्वितीय | कु. अर्णव प्रविण शिरगांवकर |
| | तृतीय | कु. हर्षवर्धिनी किरण पडवळ |
| ४थी | प्रथम | कु. प्रीती मल्हारी काटोरे |
| | द्वितीय | कु. दुर्वेश विकास रासकर |
| | तृतीय | कु. स्वरा संदीप मादखोळकर |

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

दि. २.२.२०२४ रोजी पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी व संचालक श्री. रमेश कुलकर्णी हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व माता सरस्वतीच्या प्रार्थनेने झाली. इ. १ली व २री च्या विद्यार्थ्यांनी श्रीमती स्वप्ना गायकवाड आणि श्रीमती हरप्रीत कौर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रार्थना गीत उत्तम प्रकारे सादर केले. इ. ३री व ४थी च्या विद्यार्थ्यांनी मंत्रमुग्ध करणारे स्वागत गीत सादर केले. या

विद्यार्थ्यांना श्रीमती मयुरी कदम आणि श्रीमती रेश्मा पैलकर यांनी मार्गदर्शन केले.

इ. ४थी च्या विद्यार्थ्यांनी विलक्षण आणि तपशीलवार अहवाल सादर केला. या विद्यार्थ्यांना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्यातर्फे रु. १,५००/- चे रोख पारितोषिक कौतुक म्हणून मिळाले. श्रीमती कविता पुजारी आणि श्रीमती चंदा भटकर यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. त्याच दरम्यान रंगमंचाची व्यवस्था स्वरुपा कणसे आणि शर्वरी यांनी मोनो अभिनय केला.

पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाच्या पारितोषिक विजेत्यांची नावे श्रीमती रेश्मा पैलकर यांनी वाचली आणि तिसऱ्या व चौथ्या क्रमांकाच्या पारितोषिक विजेत्यांची नावे श्रीमती हरप्रीत कौर यांनी वाचली. शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा उत्कृष्टता पृथ्वी हाऊसने सिध्द केले. प्राथमिक इंग्रजीचे चांगले सांघिक कार्य एकंदरीत दिसून आले. श्रीमती स्नेहा राणे यांनी कार्यक्रमाची सांगता पसायदानाने व आभार प्रदर्शनाने केली.

## विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. गणेश कणसे**

### माजी विद्यार्थी मंडळ हस्ताक्षर स्पर्धा २०२३-२४

दि. २३ जानेवारी २०२४ रोजी माजी विद्यार्थी मंडळ आयोजित इ. १ली ते ४थी ची हस्ताक्षर शुध्दलेखन स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत खालील प्रमाणे विद्यार्थ्यांनी बक्षिसे पटकावली :

| इयत्ता | क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे |
|---|---|---|
| १ ली | प्रथम | कु. ओवी अमोल माईन |
| | द्वितीय | कु. रुद्र श्रीधर जेजुरकर |
| | तृतीय | कु. काव्या तुषार भोर |
| २ री | प्रथम | कु. दाक्षी पराग भोसले |
| | द्वितीय | कु. आदित्य विठ्ठल दराडे |
| | तृतीय | कु. प्रनिषा प्रकाश मर्देकर |
| ३री | प्रथम | कु. रितु शशिकांत गायकवाड |
| | द्वितीय | कु. आयुष अभिजीत तोरण |
| | तृतीय | कु. आर्यन गणेश कांबळे |
| ४ थी | प्रथम | कु. प्रथमेश सूर्यकांत कदम |
| | द्वितीय | कु. धृति सचिन परबॉ |
| | तृतीय | कु. दर्शिता संजय सुतार |

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

सोमवार दि. ५ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

कार्यकमाची सुरुवात प्रमुख पाहुणे संचालक श्री. अमोल जोशी, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, संचालक श्री. सुनील रेडेकर, अनुसंधान समिती सदस्य श्री. कृ. ना. शिरकांडे यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलनाने झाली.

इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे मा. श्री. अमोल जोशी यांचा पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचाही पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

विद्यार्थी कु. आरव मोरे व विद्यार्थ्यांनी कु. आराध्या काळे इ. ४थी यांनी प्रशालेत वर्षभर राबवलेल्या स्पर्धा, उपक्रम, मिळवलेले यश व पारितोषिक, साजरे केलेले सण व उत्सव यांचा अहवाल संवाद रुपाने सादर केला. विद्यार्थिनी कु. वृतिका नाईक इ. ३री हिने शिवकालीन लाठी खेळ सादर केला. प्रमुख पाहुणे श्री. अमोल जोशी यांनी 'शिक्षणाचे आपल्या जीवनातील महत्त्व' पटवून दिले. मोबाईल फोनचा

अतिवापर टाळावा असे सांगितले. आपले शिक्षण समाजभिमुख असावे, सोशल मिडियाच्या आभासी जगात न गुंतता वास्तवात जगावे असे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थी व पालकांना केले.

त्यानंतर शै. वर्ष २०२३-२४ च्या विविध स्पर्धेत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे व इतर मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती रुपल पालकर यांनी केले. सर्व उपस्थितांचे आभार श्रीमती शिल्पकला सावंत यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम् गीताने झाली.

**आंतरशालेय समूहगीत गायन स्पर्धा**

शुक्रवार दि. १६.२.२०२४ रोजी झालेल्या एन वॉर्ड विभागीय आंतरशालेय समूहगीत गायन (भक्तिगीत) स्पर्धेत धडाकेबाज कामगिरी करीत विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

## विद्याभवन माध्यमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापिका : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

**वार्षिक चित्रकला स्पर्धा**

दि. १ डिसेंबर २०२३ रोजी सहा. शिक्षक श्री. अर्जुन मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली इ. ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांची गटानुसार वार्षिक चित्रकला स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :

**गट - ५वी/६वी**

| क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे | इ/ तु |
|---|---|---|
| प्रथम | कु. स्वरा अजित शिंदे | ५वी/क |
| द्वितीय | कु. अवंतिका सुधीर वरे | ५वी/अ |
| तृतीय | कु. दीक्षा निलेश महाडीक | ६वी/अ |
| उत्तेजनार्थ | कु. जय उमेश जामसुदकर | ६वी/क |
| | कु. प्राजक्ता राजेंद्र माने | ६वी/अ |
| | कु. जान्हवी सुनिल शिवगण | ६वी/ब |
| | कु. निहार राजेश काताळे | ६वी/क |
| | कु. स्वराली सचिन भोरे | ६वी/ब |
| | कु. सिया कृष्णा शिंदे | ६वी/क |

**गट - ७वी/८वी**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. मयांक सिध्देश्वर भागवत | ८वी/क |
| द्वितीय | कु. सुमेधा सुनिल शेजवळ | ७वी/क |
| तृतीय | कु. हितांशा सचिन शेटे | ८वी/अ |
| उत्तेजनार्थ | वैष्णवी किशोर तळेकर | ७वी/क |
| | दिव्या सुनिल तळेकर | ८वी/अ |
| | आर्या अमोल हांडे | ७वी/क |
| | मेघा मिलिंद वेलणकर | ७वी/क |
| | क्रांती अशोक नरवडे | ७वी/ब |

**गट - ९वी/१०वी**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. कोमल तुषार तोत्रे | १०वी/अ |
| | कु. उत्कर्षा गणपत पुजारी | १०वी/अ |
| द्वितीय | कु. जय महेंद्र बोडके | १०वी/अ |
| तृतीय | कु. वृषाली महेंद्र ठोंबरे | ९वी/ब |
| उत्तेजनार्थ | कु. गौरी अनिल ठोंबरे | १०वी/ब |
| | कु. शुभम विक्रांत पाचकवडे | ९वी/क |
| | कु. परी ज्ञानेश्वर इंदलकर | १०वी/क |
| | कु. दिव्यानी राकेश लाड | १०वी/अ |
| | कु. श्रेया रमेश सुंबे | १०वी/ब |

**द्वितीय घटक चाचणी व पूर्व परीक्षा**

दि. १६ जानेवारी ते १८ जानेवारी इ. ५वी ते ९वी या वर्गांची द्वितीय घटक चाचणी परीक्षा घेण्यात आली. तसेच दि. १२ जानेवारी ते २३ जानेवारी २०२४ या कालावधीत इ. १०वी ची पूर्व परीक्षा घेण्यात आली.

**शिक्षक प्रशिक्षण**

प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई आयोजित STARS प्रकल्प सन २०२३-२४ अंतर्गत अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (URC) या प्रशिक्षणाचा लाभ दि. १६ जानेवारी ते २० जानेवारी या कालावधीत श्री. अंकुश कारंडे, श्री. विजय पाटील, श्रीमती जयश्री सुतार, श्रीमती मनिषा जायभाये, श्रीमती कमल डहाके व श्रीमती पूजा पाटील या इ. ६वी ते ८वी च्या शिक्षकांनी घेतला.

### निसर्ग मंडळ आयोजित बक्षीस समारंभ

शनिवार दि. २० जानेवारी २०२४ रोजी निसर्ग मंडळ आयोजित हळदीकुंकू व बक्षीस समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील व उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर हे पाहुणे म्हणून लाभले. बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना उपस्थित पाहुणे व सहकारी शिक्षक यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

तसेच उपस्थित पाहुणे व शिक्षकांना तुळशीचे रोप देऊन हळदीकुंकू समारंभ पार पडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आसावरी पाटील व सान्वी आव्हाड यांनी केले. वार्षिक अहवाल वाचन कु. आर्या सावंत व कु. आर्या साळवी यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन सान्वी कुटे हिने केले. कार्यक्रमाचे संयोजन श्रीमती रत्नप्रभा पाटील, श्रीमती नंदिनी साके व श्री. अर्जुन मस्के यांनी केले.

### शिक्षक प्रशिक्षण

शनिवार दि. २० जानेवारी २०२४ रोजी रोटरी क्लब ऑफ मुंबई तर्फे २१ व्या शतकातील विद्यार्थ्यांसाठी कथाकथन आणि मानसिक आरोग्य या विषयावर शिक्षकांसाठी कृतिसत्र आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचा लाभ सहा. शिक्षिका श्रीमती संगीता श्रीनिवास साळी यांनी घेतला.

### माजी विद्यार्थी मंडळ हस्ताक्षर स्पर्धा २०२३-२४

दि. २३ जानेवारी २०२४ रोजी माजी विद्यार्थी मंडळ आयोजित इ. ५वी ते ८वी ची हस्ताक्षर शुध्दलेखन स्पर्धा घेण्यात आली. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे

| इयत्ता | क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे |
|---|---|---|
| ५वी | प्रथम | कु. कृतिका दत्ता सुर्वे |
| | द्वितीय | कु. सृष्टी किशोर माने |
| | तृतीय | कु. आदिती अनिल राठोड |
| ६वी | प्रथम | कु. नियती प्रदीप गुरव |
| | द्वितीय | कु. सिया कृष्णा शिंदे |
| | तृतीय | कु. संस्कृती संजय सरगर |
| ७वी | प्रथम | कु. सान्वी निलेश कुटे |
| | द्वितीय | कु. आर्या अमोल हांडे |
| | तृतीय | कु. विधी सुनिल जाधव |
| ८वी | प्रथम | कु. ज्ञानेश्वरी विजय जाधव |
| | द्वितीय | कु. तनुष्का चंद्रकांत भोज |
| | तृतीय | कु. राज ज्ञानदेव ढेबे |

### आर्थिक साक्षरता

दि. २४ जानेवारी २०२४ रोजी सकाळ NIE तर्फे विद्यार्थ्यांसाठी 'आर्थिक साक्षरता' या विषयावर विद्याभवन हायस्कूल नं. १, घाटकोपर येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी श्रीमती मानसी नगरकर यांनी इ. ५वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- ✲ बदलत्या काळानुसार प्रत्येकाला आर्थिक विषयाचे नियोजन जमले पाहिजे.
- ✲ त्याच्या भविष्यकाळासाठी पिगीबँक पासून सुरुवात होऊन सेव्हिंग अकाऊंट, शेअर्स इन्व्हेस्टमेंट इंटरेस्ट या संकल्पना त्यांना नीट समजल्या आहेत का?
- ✲ कुठे किती इन्व्हेस्टमेंट करावी? कशी करावी?

इत्यादी संकल्पना श्रीमती मानसी नगरकर यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्तम सहभाग होता. या कार्यक्रमास कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील, सकाळ वृत्तपत्र समूहाचे वितरक उपव्यवस्थापक श्री. जालिंदर शेटये आदी मान्यवर उपस्थित होते.

### शालेय हस्ताक्षर शुध्दलेखन स्पर्धा २०२३-२४

दि. २४ जानेवारी २०२४ रोजी इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांची हस्ताक्षर शुध्दलेखन स्पर्धा घेण्यात आली. पारितोषिक प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे :

| इयत्ता | क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे |
|---|---|---|
| ५वी | प्रथम | कु. स्वरा संजय नायकोडी |
| | द्वितीय | कु. आर्या मारुती जाधव |
| | तृतीय | कु. ईश्वरी श्रीधर एरंडे |
| ६वी | प्रथम | कु. वैष्णवी आप्पाराव केदार |
| | द्वितीय | कु. आसावरी अमोल पाटील |
| | तृतीय | कु. संस्कृती संजय सरगर |
| ७वी | प्रथम | कु. सान्वी निलेश कुटे |
| | द्वितीय | कु. गायत्री प्रवीण बोऱ्हाडे |
| | तृतीय | कु. समृध्दी समीर मांडवकर |
| ८वी | प्रथम | कु. तनुष्का चंद्रकांत भोज |
| | द्वितीय | कु. अथर्व दीपक नारायणकर |
| | तृतीय | कु. सार्थक रमेश शिंदे |

### शिष्यवृत्ती व्याख्यान

दि. २७ जानेवारी २०२४ रोजी इ. ८वी च्या स्कॉलरशिप विद्यार्थ्यांसाठी आणि दि. ७.२.२०२४ रोजी इ. ५वी च्या विद्यार्थ्यांसाठी श्री. पंढरीनाथ राणे यांचे गणित व बुध्दिमत्ता या विषयाचे व्याख्यान आयोजित केले होते.

### अप्सरा चित्रकला स्पर्धा

वेलफेअर फेडरेशन, गारोडीया नगर, घाटकोपर यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या अप्सरा चित्रकला स्पर्धेत कु. क्रांती अशोक नरवडे इ. ७वी/ब हिने प्रथम क्रमांक आणि कु. आनंद किशोर खंडागळे इ. ८वी/क याने द्वितीय क्रमांक पटकावला.

### निरोप समारंभ

गुरुवार दि. १ फेब्रुवारी २०२४ रोजी इंग्रजी व मराठी माध्यमाच्या इ. १०वी चा निरोप समारंभ प्रमुख पाहुणे माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष श्री. बा. गो. कुलकर्णी, श्रीमती मृणालिनी कुलकर्णी, अनुसंधान समिती सदस्य श्री. कृ. ना. शिरकांडे, सर्व विभागाचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, समन्वयक सर्व शिक्षक व परीक्षेला सामोरे जाणारे सर्व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

श्रीमती नंदा पोखरकर यांनी सर्व उपस्थितांचे, मान्यवरांचे स्वागत केले. मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर अनुसंधान समिती सदस्य श्री. कृ. ना. शिरकांडे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे श्री. बा. गो. कुलकर्णी यांचा पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्या श्रीमती मृणालिनी कुलकर्णी यांचा पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर माजी कार्याध्यक्ष श्री. कृ. ना. शिरकांडे यांचा पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

इ. १० वी च्या विद्यार्थ्यांनी शाळेबद्दलचे आपले मनोगत व्यक्त केले. तसेच मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, सहा.शिक्षिका श्रीमती मीना गायकवाड, सहा.शिक्षिका श्रीमती पद्मिनी व्यंकटरामण यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुण्या श्रीमती मृणालिनी कुलकर्णी यांनी आपल्या भाषणातून संकुचित वृत्ती न ठेवता परस्पर संवाद साधा, व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध स्पर्धा परीक्षेत सहभाग घ्या, आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जा, १०वी नंतरची मोठी सुट्टी स्वतःला आजमवण्या साठी असून स्वतःची शक्ती शोधा, कौशल्य शोधा, मळलेल्या वाटेवरुन न जाता नवीन वाट शोधा असे मोलाचे मार्गदर्शन केले. सहा. शिक्षिका श्रीमती राजेश्वरी कोणार यांनी आभार प्रदर्शन केले.

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

दि. ५.२.२०२४ रोजी विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र

बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. अमोल जोशी, अनुसंधान समिती सदस्य श्री. कृ. ना. शिरकांडे यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलाने झाली.

इ. ५वी ते ९वी च्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांचा पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे आणि इतर सर्व मान्यवरांचाही पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

विद्यार्थिनी कु. स्नेहल माने व कु. कोमल तोत्रे इ. १०वी यांनी प्रशालेत वर्षभर राबवलेल्या स्पर्धा, उपक्रम, मिळवलेले यश व पारितोषिक यांचा अहवाल संवाद रुपाने सादर केला. प्रमुख पाहुणे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी शिक्षणाचे आपल्या जीवनातील महत्त्व पटवून दिले. मोबाईल फोनचा वापर हा कार्यक्षमता नष्ट करणारा नसावा तर तो अभ्यासपूरक असावा हा मंत्र दिला. आपले शिक्षण समाजाभिमुख असावे. सोशल मीडियाच्या आभासी जगात न गुंतता वास्तवात जगावे. सत्याला सामोरे जा, समाजात असे कार्य करा, की त्याची इतिहासात नोंद झाली पाहिजे असे मोलाचे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

त्यानंतर शै. वर्ष २०२२-२३ च्या दहावी बारावी, NMMS परीक्षा, इ. ५वी/८वी शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी व चालू शैक्षणिक वर्षातील विविध स्पर्धेत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे व इतर मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मनिषा जायभाये यांनी केले. उपस्थितांचे आभार उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनिल भालचंद्र पाटील**

### होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा

ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल नं. २ ची विद्यार्थिनी कु. त्रिशा नितीन गुंजाळ इ. ६वी हिने लेखी परीक्षेत ५१ तर प्रात्यक्षिक परीक्षेत २७.५ गुण मिळवून सुयश संपादन केले. एकूण ४२.५ गुण मिळवत कु. त्रिशा हिने स्पर्धेच्या पुढील टप्प्यात प्रवेश केलेला आहे. या पुढील परीक्षेचे स्वरुप कृतिसंशोधन प्रकल्प, तोंडी परीक्षा आणि मुलाखत असे असणार आहे. कु. त्रिशा हिचे खूप खूप अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

### माजी विद्यार्थी मंडळ हस्ताक्षर स्पर्धा २०२३-२४

दि. २३ जानेवारी २०२४ रोजी माजी विद्यार्थी मंडळ आयोजित इ. ५वी ते ८वी ची हस्ताक्षर शुध्दलेखन स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी बक्षिसे पटकावली

| इयत्ता | क्रमांक | विद्यार्थ्यांची नावे |
|---|---|---|
| ५ वी | प्रथम | कु. वेदांत शशिकांत घांगळे |
| | द्वितीय | कु. काव्या समीर पाठक |
| | तृतीय | कु. आराध्या शंकर ताकळकर |
| ६ वी | प्रथम | कु. वैष्णवी सुधीर मांडवकर |
| | द्वितीय | कु. पूर्वा मंगेश देसाई |
| | तृतीय | कु. संचिता अनिल डोंबळे |
| ७ वी | प्रथम | कु. आयुषी किरण पावडे |
| | द्वितीय | कु. स्वरा सुरेश गलांडे |
| | तृतीय | कु. अक्षया संजय वाळके |
| ८ वी | प्रथम | कु. श्रावणी सचिन गोरडे |
| | द्वितीय | कु. निषिता श्रीनिवास कामतम |
| | तृतीय | कु. रुतुजा विश्वनाथ सळेकर |

## स्कॉलरशिप व्याख्यान

विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या स्कॉलरशिपच्या विद्यार्थ्यांसाठी शनिवार दि. २७.१.२०२४ रोजी इ. ८वी साठी तर बुधवार दि. ७.२.२०२४ रोजी इ. ५वी साठी स्कॉलरशिप विषयातील तज्ञ शिक्षक श्री. पंढरीनाथ राणे यांचे व्याख्यान ठेवण्यात आले होते. श्री. पंढरीनाथ राणे यांनी विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप विषयातील बारकावे समजावून सांगितले तसेच परीक्षेला न भिता कशाप्रकारे तोंड दिले पाहिजे हे सांगून मुलांचा आत्मविश्वास वाढविला व त्यांना शुभेच्छा दिल्या.

## निसर्ग मंडळ आयोजित वार्षिक पारितोषिक व बक्षिस वितरण समारंभ

गुरुवार दि. ८.२.२०२४ रोजी निसर्ग मंडळ आयोजित वार्षिक पारितोषिक व बक्षिस वितरण समारंभाचा कार्यक्रम विद्याभवनच्या क्रीडांगणावर संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार उपस्थित होत्या. तसेच मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन व सहकारी शिक्षक उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी व मान्यवरांनी निसर्ग मंडळाच्या वर्षभरात घेतल्या गेलेल्या विविध स्पर्धेबाबत विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन त्यांचा सत्कार केला. प्रमुख पाहुण्या श्रीमती योगिनी पोतदार यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व अशाच प्रकारे दरवर्षी वेगवेगळया स्पर्धेत सहभाग घेऊन आपले कार्यक्रम यशस्वी करा असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील यांनी निसर्ग मंडळातर्फे वर्षभर उत्कृष्ट कार्यक्रम साजरे केल्याबद्दल श्रीमती संगिता मुंढे, श्रीमती हर्षदा गवळी व श्रीमती धनश्री मोहरे यांचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. शाल्मली मोहीते व कु. सई केंजळे यांनी केले. आभार प्रदर्शन विद्यार्थी कु. पृथ्वीराज नावडे याने केले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा ! ❊**

**❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊**



दि. २६ जानेवारी २०२४ प्रजासत्ताक दिनी ध्वज वंदन करताना प्रमुख अतिथी श्रीमती अनुराधा मेहेंदळे माजी मुख्याधापिका आणि इतर मान्यवर

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊



पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळातर्फे आयोजित
बक्षिस समारंभप्रसंगी विद्यार्थ्याला
प्रशस्तीपत्र व रोख पारितोषिक देताना
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



इ. १०वी सदिच्छा समारंभ प्रसंगी उपस्थित
श्रीमती मृणाल कुलकर्णी यांचा सत्कार करताना
समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन समवेत
माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बा. गो. कुलकर्णी



होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेतील
यशस्वी विद्यार्थीनी कु. त्रिशा नितीन गुंजाळ
हिचे अभिनंदन करताना
मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील,
मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार व
मार्गदर्शक शिक्षिका श्रीमती अनुराधा वाघमारे



निसर्ग मंडळ आयोजित
पारितोषिक वितरण
समारंभातील पारितोषिक
प्राप्त विद्यार्थी व शिक्षक

# अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

### हुतात्मा दिन साजरा

अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी हुतात्मा दिन म्हणून साजरी करण्यात आली.

प्राचार्य प्रा. डॉ. एम. व्ही. भालेराव यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख डॉ. अमोल रासने, डॉ. सोनाली जाधव, प्रा. सतीश भदाणे, प्रा. जगदीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया, प्रा. इंद्रजीत सोनवणे, प्रा. शुक्ला, ग्रंथपाल प्रा. संदीप दराडे, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थीनी कु. अपर्णा पाटील हिने केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिद्धेश राजोळे याने केले. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जीवनाविषयी आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या त्यांच्या कार्याविषयी माहिती दिली. विद्यार्थी कु. वेदांत भोर याने सर्वांचे आभार मानले.

### डेटा गोपनीयता दिवस साजरा

महाविद्यालयातील संगणक विभाग तर्फे डेटा गोपनीयता दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सायबर संस्कार चे संचालक डॉ. तन्मय दीक्षित, प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव तसेच सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. संगणक विभाग प्रमुख प्रा. जगदीश कापडणीस यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले.

डॉ. तन्मय दीक्षित यांनी डेटाच्या गोपनीयतेचे संरक्षण कसे करावे व तसेच त्याबद्दल जागरूकता निर्माण केली. विद्यार्थी कु. वैष्णवी वाटपडे आणि कु. यश टीले यांनी सूत्रसंचालन केले. तसेच विद्यार्थी कु. गुंजन जयराज, कु. प्रथमेश पाडवी यांनी नाटक सादर केले. प्रा. ए. एच जोशी, प्रा. जे. व्ही. बोरसे, प्रा. एस. एन. माळी व इतर सर्व विभागीय शिक्षक कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना कार्यक्रमाच्या सादरीकरणासाठी मार्गदर्शन केले. प्रा. आर. पी. पुरकर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

### विद्यार्थ्यांना विंजित टेकफेस्ट २०२४ हॅकेथॉन स्पर्धेत प्रथम पुरस्कार प्राप्त

संदीप विद्यापीठात 'विंजित टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनी द्वारे 'विंजित टेकफेस्ट २०२४' या हॅकेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयातील आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स या विभागातील विद्यार्थी कु. अथर्व शिंदे, कु. अक्षय धुमाळ, कु. अथर्व आहेर, कु. मेहुल परदेशी, कु. आर्यन वरखेडे आणि कु. श्रेयस वरल यांनी प्रथम क्रमांक मिळविला. या विद्यार्थ्यांना श्री. गौतम भट्टाचार्य यांच्या हस्ते रु. १५,०००/- चा धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले. नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग (NLP) आणि जनरेटिव्ह एआय तंत्रांचा वापर करून आर्थिक बातम्यांच्या मथळ्यांबद्दलच्या भावनेचा अंदाज लावणारा उपाय विकसित करण्या भोवती सहभागींना सादर केलेले मुख्य आव्हान होते. बातम्यांचे मथळे आणि संबंधित भावना असलेल्या प्रशिक्षण डेटासेटसह सशस्त्र, सकारात्मक, नकारात्मक किंवा तटस्थ भावनांचे अचूक वर्गीकरण करणारे मॉडेल विद्यार्थ्यांनी तयार केले.

या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे समन्वयक श्री. इंद्रजित सोनावणे यांनी विद्यार्थ्यांना मागदर्शन केले.

## जिल्हास्तरीय स्वरचित काव्य संमेलनातील विद्यार्थ्यांचे यश

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हास्तरीय काव्यसंमेलन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थी कु. हर्षल महेंद्र जाधव याने ५ वा क्रमांक मिळविला. कु. हर्षल जाधव हा विद्यापीठस्तरीय काव्यसंमेलन स्पर्धेत महाविद्यालयाचे नेतृत्व करणार आहे. इंग्रजी, मराठी व हिंदी या तीन भाषेत झालेल्या नाशिक जिल्हातील विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या स्पर्धेत महाविद्यालयातील कु. पार्थ सावळे, कु. निलेश सोमासे, कु. स्नेहल जाधव, कु. चेतना ह्यालिज, कु. नंदिनी वाखारे यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. या सर्व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी डॉ. शिवाजी गवळी यांनी मार्गदर्शन केले.

## पोस्टर मेकिंग आणि निंबध लेखन स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे यश

निवडणूक साक्षरता मंडळ अंतर्गत राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त महाविद्यालयात पोस्टर आणि निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पोस्टर स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील कु. आकांक्षा बोडके, कु. श्रुती पवार, कु. भक्ती पानगव्हाणे, कु. अक्षय पानगव्हाणे तर निबंध लेखन स्पर्धेमध्ये कु. अबोली सोनवणे, कु. आकांक्षा बोडके, कु. रुणाली पाटील, कु. श्रुती दंडगवाल विजेते ठरले. सर्वाना मा. जिल्हाधिकारी श्री. जलज शर्मा यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेसाठी निवडणूक साक्षरता मंडळतील समन्वयक प्रा. संदीप दराडे तसेच सर्व सदस्य प्रा. पूनम गोसावी, प्रा. वृषाली जाधव, प्रा. सोनाली काळे, प्रा. अनघा साळुंके, प्रा. संतोष चांडोले आणि स्वप्ना जोशी यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !**

*** कै. मा. ब. उर्फ ककासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी शाखा, नाशिक ***



वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांना पारितोषिके देताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कार्यवाह श्री.संजय गुंजाळ, संचालक श्री. सुनील रेडेकर व श्री अमोल जोशी मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी

# शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : संजय नि. गुंजाळ**

**प्राचार्य : डॉ. सुरेश पाटील**

### सावित्रीबाई फुले जयंती

दि. ३ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

### वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील होते. विद्यार्थिनी-शिक्षिका प्राजक्ता आव्हाड हिने कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर सहभागी स्पर्धक कु. शाम रिठे, कु. देवयानी गगे, कु. माई बागूल, कु. साधना मेतकर आणि कु. आकांक्षा खैरनार यांनी सावित्रीबाई फुले यांच्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले.

प्राध्यापिका मनीषा पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचा शेवट अध्यक्षीय भाषणाने झाला. विद्यार्थी-शिक्षक कु. शाम रिठे याने उपस्थित अध्यक्ष, विद्यार्थी-शिक्षक, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांचे आभार मानले.

### राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (NAAC) मार्गदर्शन

दि. ५ जानेवारी २०२४ राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (NAAC) याबद्दल मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संतोष रुकारी हे उपस्थित होते.

प्रारंभी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. यावेळी डॉ. संतोष रुकारी यांनी राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेबाबत प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. सुरुवातीला त्यांनी NAAC चे विविध पैलू समजावून सांगितले. NAAC समितीचे प्रत्यक्ष कामकाज कसे असते, समितीला महाविद्यालयाकडून कोणत्या प्रकारचे कामकाज अपेक्षित असते, विद्यार्थ्यांचे सराव पाठ, अभ्यासक्रमांतर्गत उपक्रम, विद्यार्थ्यांचे अभिप्राय, सांस्कृतिक कार्यक्रम, संशोधन, अंतर्गत करार, ग्रंथालय यांविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रा. डॉ. ज्योती मोरे यांनी प्रमुख पाहुण्यांचे आणि अपस्थितांचे आभार मानले.

### राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती

दि. १२ जानेवारी २०२४ रोजी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. विद्यार्थी-शिक्षक शाम रिठे याने राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी सर्व विद्यार्थी-शिक्षक, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

दि. २३ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती उत्साहात साजरा करण्यात आली. विद्यार्थिनी-शिक्षिका प्राजक्ता आव्हाड हिने प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. त्यानंतर सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-शिक्षकांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आदरांजली अर्पण केली. विद्यार्थिनी-शिक्षिका प्राजक्ता आव्हाड हिने उपस्थितांचे आभार मानले. ***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

**माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग**

### पोलिस स्थापना दिवस

दि. २ जानेवारी २०२४ रोजी महाराष्ट्र पोलीस दल यांनी पोलीस विभागाच्या वतीने दि. २ ते ८ जानेवारी २०२४ या सप्ताहात महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या अनुषंगाने पोलीस परेड मैदान मुख्यालय नाशिक येथे पोलीस परेड व शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनास नाशिक शहर पोलीस विभागाच्या वतीने पोलीस आयुक्त श्री. संदीप कर्णिक यांच्या उपस्थितीत इ.८वी व इ.९वी च्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. यावेळी पोलीस दलातील विविध विभागाच्या करामती मांडण्यात आल्या होत्या. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांना शस्त्रांविषयी माहिती सांगण्यात आली. तसेच वाहतूक पोलीस शाखेच्या वतीने वाहतूक नियंत्रणाबाबत पत्रकाद्वारे माहिती देण्यात आली.

### सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

दि. ३ जानेवारी २०२४ रोजी स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भारतामध्ये स्त्री शिक्षणाची सुरुवात करण्याच्या त्यांच्या महान कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शालेय परिपाठात इ.८वी च्या विद्यार्थ्यांनी महिला सक्षमीकरणासाठी सावित्रीबाई फुले यांच्या समाज - कार्यातील महत्त्वपूर्ण योगदानाची माहिती दिली.

### सायबर सुरक्षा अभियान

दि. ५ जानेवारी २०२४ रोजी सायबर सुरक्षा या विषयावर सायबर गुन्हेगारी आणि सायबर सुरक्षेचे महत्त्व याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी इ.१०ते १२वी च्या विद्यार्थ्यांसाठी अतिथी व्याख्यान आयोजित केले.

या माहितीपूर्व व्याख्यानाची सुरुवात अतिथी श्री गयास शेख, संसाधन व्यक्ती आणि सायबर क्राईम विभागाचे कार्यकारी संचालक सौ. समेरप्रित कौर यांच्या सत्काराने झाली. या व्याख्याना द्वारे विद्यार्थ्यांना आज भेडसावणाऱ्या सायबर गुन्ह्याचा धोका, हॅकर्स, फेसबुक, आणि इंस्टाग्राम वरील अकाउंटचा चुकीचा वापर इ. बाबत जागरूक करण्यात आले. विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटी मधील करिअर संधी विषयी माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी व्याख्यानानंतर उपस्थित राहून प्रश्न विचारले. वर्ग शिक्षकांच्या आभार प्रदर्शनाने व्याख्यानाची सांगता झाली.

### ७५ वा प्रजासत्ताक दिन अमृत महोत्सव उत्साहात साजरा

दि. २६ जानेवारी २०२४ या दिवशी ७५वा प्रजासत्ताक दिन अमृत महोत्सव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व झेंडा गीत सादर केले. परेड करत विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय ध्वजाला सलामी दिली. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने एकत्रितपणे भारतीय संविधानाचे वाचन करण्यात आले. सर्व विभागातील विद्यार्थ्यांनी भाषणांमधून प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगितले. देशभक्तीपर गीत, नृत्य, प्रात्यक्षिक सादर केले. अमृत महोत्सव दिनानिमित्त सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा

दि. ३० जानेवारी २०२४ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनात उत्साहाने भाग घेतला. वार्षिक स्नेहसंमेलनाचा विषय हा पंचमहाभूतांतील तत्त्वावर आधारित होता. सर्व विद्यार्थ्यांनी पंचमहाभूतांतील तत्त्वे म्हणजेच पाणी, अग्नी, वायू, आकाश यावर आधारित नृत्य अविष्कार दाखविला. पंचमहाभूतांतील तत्त्वांचे काळानुसार जतन करणे व त्याचे संरक्षण व संवर्धन करणे हे गरजेचे आहे हा संदेश विद्यार्थ्यांनी पालकांपर्यंत पोहोचवला. याप्रसंगी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. अमोल जोशी तसेच संस्थेच्या देणगीदार व हितचिंतक श्रीमती गंगुताई धामणकर तसेच प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य आणि पूर्व प्राथमिक, माध्यमिक, व उच्च माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पूर्व प्राथमिक विभाग

**दि. ३० जानेवारी२०२४ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.**

प्रमुख पाहुणे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पूर्व प्राथमिक विभागाच्या चिमुरड्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनात उत्साहाने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सोनिया राजवाडे यांनी केले. वार्षिक स्नेहसंमेलनाचा विषय हा इंद्रधनुष्य संकल्पनेवर आधारित होता. नर्सरी, ज्युनिअर केजी, सिनियर केजी च्या विद्यार्थ्यांनी सप्तरंगांची माहिती दिली. याप्रसंगी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, संचालक श्री. अमोल जोशी, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य तसेच पूर्व प्राथमिक व माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गीता तोडी यांनी केले.

***

## * विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगाव (अं.), नाशिक *



उत्तर महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करणारी विद्यार्थिनी कु. भाग्यश्री श्रावण मासुळे, समवेत सहपर्यवेक्षक व ज्येष्ठ क्रीडा शिक्षक श्री. संजय जोशी व श्री. संजय गीते आदी मान्यवर

# श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ** **प्राचार्य : डॉ. एस. जी. वाकचौरे**

निर्भय कन्या अभियान कार्यशाळा संपन्न

महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने निर्भय कन्या अभियान कार्यशाळा संपन्न झाली. प्राचार्य डॉ. वाकचौरे यांनी अध्यक्षीय मनोगतातून निर्भय कन्या अभियानाचे महत्त्व आणि उद्देश स्पष्ट केला. मुलींनी प्रत्येक गोष्टीला आत्मविश्वासपूर्वक सामोरे गेले पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे ध्येय गाठले पाहिजे असे प्रतिपादन केले. प्रथम सत्रात म्हसरूळ स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुभाष ढवळे साहेब यांनी विद्यार्थिनींना महिला सबलीकरण तसेच महिलांसाठी कायदेविषयक सुरक्षा यावर व्याख्यान देऊन योग्य ते मार्गदर्शन केले. आपले ध्येय निश्चित करून ते साध्य करण्याचा प्रयत्न करून यशस्वी व्हा आणि सगळ्यांचा सन्मान ठेवून जीवनात पुढे जाण्याचा प्रयत्न करा. तसेच जीवनात कोणत्याही आमिषला बळी पडू नका. आपला देश, समाज यासाठी तुम्हीच आधार आहात. तसेच त्यांनी मुलींना एक गाणे ऐकवून बापाची व्यथा मांडण्याचा प्रयत्न करत मार्गदर्शन केले. समाज माध्यमांचा योग्य तो वापर करा, त्याला बळी पडू नका, असा अनमोल संदेश त्यांनी या कार्यशाळेत दिला. पोलीस निर्भया पथकाच्या पोलीस स्वाती ढगे यांनी मुलींना आज समाजातील आभासी जगापासून दूर राहण्याचा सल्ला देत, निर्भीडपणे प्रत्येक घटनेला सामोरे जाण्याचे आवाहन केले. काही अडचण आल्यास निर्भय पथक तसेच दामिनी पथक यांची मदत कशी घेता येईल याबाबत विद्यार्थिनींशी संवाद साधला.

दुसऱ्या सत्रात डॉ. प्रतिभा सांगळे यांनी हे पुष्प गुंफताना विद्यार्थिनींना वाढत्या वयानुसार आरोग्याच्या वेगवेगळ्या समस्या निर्माण झाल्या तरी घाबरून न जाता त्याला आत्मविश्वासाने सामोरे जा. आपल्या जीवनात आपले आरोग्य हा आपला सगळ्यात मोठा दागिना आहे. त्याला काळजीपूर्वक जपा. असा मोलाचा सल्ला दिला. कुठलाही रोग, आजार आपल्याला होऊच नये. यासाठी काळजी घ्या. सखी सहेली संवाद या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थिनींना मोलाचे मार्गदर्शन केले. श्री. विक्रम बिडवे, यांचेही कार्यक्रमास सहकार्य मिळाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुती पेठकर हिने केले, तर कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. सोमनाथ विघे यांनी केले होते. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा. अर्जुन पगारे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या प्रमुख प्रा. योगिता काकड, कला विभागप्रमुख डॉ. हेमांगिनी पाटील, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. प्रतिभा रायते, विज्ञान विभागप्रमुख प्रा. मिनल जाधव, संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. जयमाला सातपुते, श्री. संदीप देटके, गणेश कुलकर्णी, सचिन देव व लोकेश खलाणे, तांत्रिक सहायक संजय चौहान, तसेच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. ***

**आपला पत्ता बदललेला आहे का?**
**समाचार संदर्भातील आपला बदललेला पत्ता त्वरीत कळवावा ही विनंती.**
**पत्ता कळविताना जुना व नवा दोन्ही पिन कोड तसेच आपला ईमेल आयडी सुध्दा कळवावा म्हणजे आपणास ई-समाचार पाठविणे सोईचे होईल.**
pvgsamachar@gmail.com
**या ईमेल आयडी वर कळवावे.**
**संपादक**

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक
**संचालक : श्री. अमोल म. जोशी**
**प्र. मुख्याध्यापक : श्री. शरद कोठावदे**

### ग्रंथ प्रदर्शन
विद्यालयात शिक्षक व विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर तयार केलेल्या हस्तलिखितांचे ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी केले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. प्रदर्शनात ५वी ते १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना हस्तलिखिते दाखवून त्याची निर्मिती प्रक्रिया, महत्त्व ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांनी समजावून सांगितले. संचालक श्री. अमोल जोशी यांनी ग्रंथ प्रदर्शनाला भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले.

### प्रजासत्ताक दिन
दि. २६ जानेवारी २०२४ रोजी विद्यालयात ७५ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संचालक श्री. अमोल जोशी व सध्या सैन्य दलात कार्यरत असणारे विद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. निलेश भिसे यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मान्यवरांचे स्वागत मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी केले. यावेळी सेंट्रल गोदावरी कृषक सेवा संघ गंगापूर यांच्यावतीने इयत्ता दहावी व बारावी या वर्गात प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन श्री. प्रवीण दाते व श्री. तुकाराम दाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून संचालक श्री. जोशी यांनी प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देऊन विद्यालयात झालेल्या विविध विकास कामांचा आढावा घेतला. विद्यालयातील शिक्षण हे कुठल्याही इंग्रजी माध्यमांच्या शाळांपेक्षा दर्जेदार असल्याचे प्रतिपादन करून पालकांनी आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या आपल्या विद्यालयातच प्रवेश घेण्याचे आवाहन केले. यावेळी सरपंच श्री. रविंद्र निंबेकर, उपसरपंच श्री. शांताराम पगार, पर्यवेक्षक श्री. संजय जोशी हे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. लक्ष्मण चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले. पुरस्कारांच्या यादीचे वाचन श्री. चेतन गोऱ्हे यांनी केले. आभार श्रीमती मोहिनी पंगुडवाले यांनी मानले. वंदे मातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली.

### स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ
दि. ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यालयात स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी सर्वश्री कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष सुभाष जिर्गे, कार्यवाह संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव दिनेश मिसाळ, संचालक सुनील रेडेकर, आनंद कुलकर्णी, राजेंद्र कडुसकर, श्री रमेश कुलकर्णी, डॉ. राजेंद्र कांबळे व शाखा संचालक अमोल जोशी उपस्थित होते. विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने श्री. संजय गीते, श्रीमती मोहिनी पांगुडवाले यांच्या मार्गदर्शनात प्रमुख अतिथींचे स्वागत केले. मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून कै. दादासाहेब केतकर व कै. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमांचे पूजन करुन कार्यक्रमाची विधिवत सुरुवात झाली. आपल्या स्वागतपर प्रास्ताविकात मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी शैक्षणिक वर्षात विद्यालयाने केलेल्या कामगिरीचा आढावा घेतला. प्रमुख अतिथींचे स्वागत सत्कार व पाहुण्यांचा परिचय संचालक श्री. अमोल जोशी यांनी करुन दिला. यानंतर राष्ट्रीय व राज्यस्तरावर क्रीडा स्पर्धेत यश मिळवणाऱ्या खेळाडूंचा व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक श्री. संजय जोशी व श्री. संजय गीते यांचा सत्कार करण्यात आला. स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकणाऱ्या अकरा विद्यार्थ्यांचा व

मार्गदर्शकांचा सत्कार मान्यवरांनी केला. यावेळी संस्थेला भरघोस देणगी देणारे उपशिक्षक श्री. मंथन वाळुंज यांचाही सत्कार करण्यात आला. शालाबाह्य निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यालयाच्या ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांचाही सत्कार करण्यात आला. तसेच विविध बौद्धिक स्पर्धा, भूगोल प्रज्ञा शोध स्पर्धा परीक्षा, देणगी व्याज विनियोग उपक्रमांतर्गत पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्षीय मनोगतात कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी तळेगाव शाखेच्या व विद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करतानाच तळेगाव शाखेच्या विकासासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले. देणगी व्याज विनियोग पुरस्काराचे वाचन श्री. चेतन गोऱ्हे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार सौ. स्वाती भावसार यांनी मानले यानंतर विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गीत व नृत्य अविष्कारांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी पालक, आजी माजी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

दि. १ फेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या पारितोषिक वितरणाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे होते. या कार्यक्रमाला विस्तार अधिकारी श्री. मोहन रणदिवे उपस्थित होते. पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. यावेळी ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांच्या संकल्पनेतून व श्री. साहेबराव ठोंबरे यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चांद्रयान ३ या हस्तलिखिताचे प्रकाशन शालेय पोषण आहारअधीक्षक श्री. साळी व श्री. भाबड यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी विविध क्रीडा स्पर्धेत राष्ट्रीय व राज्यस्तरावर यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सेवानिवृत्त प्राचार्य श्री. शिवाजी माळी यांनी क्रीडा रत्न व स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा विद्या प्रशाला स्कॉलर्स पुरस्काराने सन्मान करण्यात आला. तसेच पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक श्री. संजय जोशी आणि श्री. संजय गीते यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने श्री. शिवाजी माळी यांनी सन्मानित केले. मुख्याध्यापक पुरस्कृत उपक्रमशील शिक्षक पुरस्काराने श्रीमती प्रतिभा ठाकूर यांना सन्मानित करण्यात आले.

### आशीर्वाद समारंभ

दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजी इयत्ता बारावी व दहावीच्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी बारावी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत शिक्षकांप्रती ऋण व्यक्त केले.

बारावीच्या आशीर्वाद समारंभात मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे, पर्यवेक्षक श्री. संजय जोशी, सेवानिवृत्त प्राचार्य श्री. शिवाजी माळी, शिक्षक प्रतिनिधी श्री. सुखदेव निंबेकर यांच्यासह वर्गशिक्षक श्री. चेतन गोऱ्हे, श्री. साहेबराव ठोंबरे व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत पुढील आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

### स्नेहभोजन कार्यक्रम

दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजी संस्थेतर्फे विद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षकांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला.

### अभिनंदनीय क्रीडा वृत्त

दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी साकुर फाटा, ता. इगतपुरी येथे झालेल्या उत्तर महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत विद्यार्थिनी कु. भाग्यश्री श्रावण मासुळे इ.१२वी हिने ४५ ते ५० किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवत रोख रु. ४,०००/- व चषक पारितोषिक मिळविले. तिला पर्यवेक्षक व ज्येष्ठ क्रीडा शिक्षक श्री. संजय जोशी व श्री. संजय गिते यांचे मार्गदर्शन लाभले.

***

## ✻ विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगाव (अं.), नाशिक ✻



दि. २६ जानेवारी २०२४ प्रजासत्ताक दिनी ध्वजवंदनप्रसंगी उपस्थित सर्वश्री संचालक अमोल जोशी, लान्सनायक निलेश भिसे, मुख्याध्यापक शरद कोठावदे, पर्यवेक्षक संजय जोशी, तुकाराम दाते



वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण कार्यक्रमप्रसंगी कुलगुरु कै. दादासाहेब केतकर व गुरुवर्य कै. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमांचे पूजन करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, संचालक श्री. अमोल जोशी, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी



↑ चांद्रयान ३ या हस्तलिखिताचे प्रकाशन करताना शालेय पोषण आहार अधीक्षक श्री. साळी, श्री. भाबड, मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे, पर्यवेक्षक श्री. संजय जोशी, ग्रंथपाल सौ. अर्चना गीत, श्री. साहेबराव ठोंबरे, शिक्षक प्रतिनिधी श्री. सुकदेव निंबेकर

↓ शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत संस्था पदाधिकारी आणि मान्यवर



# विद्याभवन–नेरुळ, नवी मुंबई शाखा

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

### अभिनंदनीय

दि. १० डिसेंबर २०२३ रोजी चिन्मय मिशन, मुंबई यांच्यातर्फे खारघर येथे आयोजित करण्यात आलेल्या गीतापठण स्पर्धेमध्ये प्राथमिक इंग्रजी विभागाच्या पुढील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

**गट/झोन - सी प्रेरणा / बी प्रेरणा**

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | क्रमांक | बक्षीस |
|---|---|---|---|
| कु. दृष्टी पाटील | ४थीसी | तृतीय | सन्मानचिन्ह प्रमाणपत्र |
| कु. त्रिशा चतुर्वेदी | ३रीसी | द्वितीय | ---''--- |
| कु. स्पृहा नलावडे | २रीबी | उत्तेजनार्थ | पदक प्रमाणपत्र |
| कु. तनुष पाटील | २रीबी | द्वितीय | सन्मानचिन्ह प्रमाणपत्र |
| कु. नेहा शिरसाट | १लीबी | उत्तेजनार्थ | पदक प्रमाणपत्र |
| कु. विराट घोरपडे | १लीबी | उत्तेजनार्थ | ---''--- |

### वार्षिक शालेय क्रीडा स्पर्धा बक्षिस वितरण समारंभ

दि. १५ डिसेंबर २०२३ रोजी वार्षिक शालेय क्रीडा स्पर्धा बक्षिस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री. प्रशांत पाटील (डायरेक्टर, रायजर्स अॅकडमी, इंटरनॅशनल अॅथलीट) उपस्थित होते. याप्रसंगी संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनिषा मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती अस्मिता सलगर, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, पालक प्रतिनिधी श्रीमती पल्लवी गलगली, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती मनिषा मुळीक यांनी प्रमुख अतिथी श्री. प्रशांत पाटील यांचा परिचय करुन दिला. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन श्री. प्रशांत पाटील यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थी मित्रांनो, तुम्हाला आवडेल ते क्षेत्र निवडा आणि जिद्दीने पुढे जा. तुम्हाला घडवणाऱ्या शाळेचा, शिक्षकांचा आदर करा. प्रयत्न करा, यश तुमच्या जवळ असेल असे आवाहन प्रमुख अतिथी यांनी विद्यार्थ्यांना केले. समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक यांनी खेळ खेळण्यासाठी नियमित व्यायाम करा, तंदुरुस्त रहा, योग्य आणि पौष्टीक आहार घ्या, यामुळे तुम्ही निरोगी राहाल. त्यामुळे खेळ खेळण्यासाठी तुमची क्षमता व चपळता वाढेल, असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर प्रमुख अतिथी व मान्यवरांच्या हस्ते वार्षिक शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती प्रतिभा कुमकर यांनी केले. वंदेमातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.

### अभिनंदनीय

* दि. २० डिसेंबर २०२३ रोजी रामकृष्ण मिशन विवेकोत्सव, रामकृष्ण मठ, खार येथे आंतरशालेय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्राथमिक इंग्रजी विभागाचा विद्यार्थी कु. दक्ष विनायक परब याने द्वितीय क्रमांक पटकावला. त्याचे शाळा व संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!

* दि. २१ डिसेंबर २०२३ रोजी सांस्कृतिक कलादर्पण, ठाणे येथे आंतरशालेय बालनाट्य आणि लोकनृत्य महोत्सव विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विभागाच्या शिक्षक संघाने नाट्यस्पर्धेत प्रथम क्रमांक संपादन केला. ''मी आहे ना'' किशोरवयातील नैराश्य, कारणे आणि मानसिक विकार, नैराश्य हे दिसत नाही ते समजून घ्यावे लागते. मुलांना वेळ द्यावा लागतो आणि तो पालकांनी द्यावा असे आवाहन या नाटिकेतून करण्यात आले. तसेच नाटिकेमध्ये उत्कृष्ट भूमिका साकारल्याबद्दल

शिक्षक श्री. संकेत थळे यांना उत्कृष्ट अभिनेता, शिक्षिका श्रीमती प्रतिभा कुमकर यांना उत्कृष्ट अभिनेत्री, शिक्षिका श्रीमती राखी लोणकर यांना उत्कृष्ट दिग्दर्शक व विद्याभवन प्राथ. विभाग शिक्षक संघाला उत्कृष्ट लेखक या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याशिवाय विभागाच्या विद्यार्थ्यांच्या नृत्य स्पर्धेला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक तर नाटिकेला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. वाहतुकीचे नियम या विषयावर चिमुकल्यांनी नाटिकेचे सादरीकरण केले होते. हे यश संपादित केल्याबद्दल विद्याभवन शाळा नेरुळ ला रु. २५,०००/- किंमतीचा भव्य फिरता चषक देण्यात आला.

### समूह नृत्य

दि. २२ डिसेंबर २०२३ रोजी विद्या उत्कर्ष मंडळ, बेलापूर, नवी मुंबई यांच्या विद्यमाने नवी मुंबई आंतरशालेय समूह नृत्य स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत प्राथमिक इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्राथमिक गटात द्वितीय क्रमांकाचे बक्षिस प्राप्त केले. प्रमाणपत्र, चषक व रोख रक्कम रु. ३,०००/- देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**पर्यवेक्षक : सौ. अस्मिता सलगर**

### पारितोषिक वितरण सोहळा

दि. १९ डिसेंबर २०२३ रोजी विभागातर्फे वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संचालक श्री. दिनेश मिसाळ, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनिषा मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती अस्मिता सलगर उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व गणेश पूजनाने झाली. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांना मैदानी खेळांचे महत्व पटवून दिले. आपले शारीरिक व मानसिक स्वास्थ उत्तम राखण्यासाठी सर्वांनी मैदानी खेळ खेळले पाहिजेत व मोबाईल साठी कमीत कमी वेळ दिला पाहिजे असे सांगितले. यानंतर पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा पदके व प्रशस्तीपत्रे देऊन गुणगौरव करण्यात आला. याप्रसंगी सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कल्पना स्वॅन यांनी केले.

### आंतरशालेय नृत्य स्पर्धा

दि. २१ डिसेंबर २०२३ रोजी सांस्कृतिक कलादर्पण, ठाणे यांच्यावतीने आंतरशालेय नाट्य व नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ठाणे, नवी मुंबई, डोंबिवली, मुलुंड, दादर इ. शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. ज्युनियर के.जी चे दोन संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. दोन्ही संघांनी अतिशय छान लोकनृत्य सादर करुन द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

दि. २२ डिसेंबर २०२३ रोजी पूर्व-प्राथमिक इंग्रजी विभागातर्फे नाताळ सण तसेच 'रेड डे' चे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी रेड (लाल) रंगाचे कपडे परिधान करुन आले होते. काही विद्यार्थी सांताक्लॉजची वेशभूषा करुन आले होते. जिंगल बेल, जिंगल बेल या गाण्यावर विद्यार्थ्यांसह शिक्षिकांनीही नृत्य केले. सांताक्लॉज बनविणे, ख्रिसमस ट्री, रंगकाम करणे इ. उपक्रमांत सर्व विद्यार्थी अतिशय उत्साहात सहभागी झाले होते. नववर्षाच्या व नाताळच्या शुभेच्छा देऊन आनंदात या कार्यक्रमाची सांगता झाली.

### वेशभूषा स्पर्धा

दि. ३० डिसेंबर २०२३ व १ जानेवारी २०२४ रोजी वेशभूषा स्पर्धा संपन्न झाली. सदर स्पर्धेसाठी श्रीमती कुलकर्णी परीक्षक होत्या. मोठा शिशु वर्ग - नेते, छोटा शिशु - आपले मदतनीस, नर्सरी - फळे असे विषय देण्यात आले होते.

तीनही वर्गातील विद्यार्थ्यांनी वेशभूषा स्पर्धेत सहभाग घेतला व सुंदर वेशभूषा व अभिनय केला.

भरपूर विद्यार्थी बक्षिस पात्र झाले. या कार्यक्रमास मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ उपस्थित होत्या.

**स्नो मॅन बनविणे उपक्रम**

ख्रिसमस डे साजरा करताना पूर्व-प्राथमिक विभागाने विद्यार्थ्यांना स्नो मॅन कसा बनवायचा हे शिकविले. क्राफ्ट पेपरचे दोन गोल आकार कापून त्यावर स्नो मॅन ची दाढी व टोपी अशा प्रकारे डेकोरेशन करुन स्नो मॅन तयार केला. अशा प्रकारचे स्नो मॅन मुलांना नाताळ सणाला भेट म्हणून देण्यात आले.

## विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

### नेरूळ शाखा,नवी मुंबई

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षा सुयश**

विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेतील इ. ६वीचा विद्यार्थी कु. अथर्व गायकवाड याची होमी भाभा बाल वैज्ञानिक प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली आहे.

**भास्कराचार्य गणितीय टॅलेंट शोध परीक्षा सुयश**

भास्कराचार्य गणितीय टॅलेंट शोध परीक्षा दि. १० डिसेंबर २०२३ रोजी घेण्यात आली. या परीक्षेस इ. ६वीचे ३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी कु. विभूती दत्तात्रय गुंजाळ हिची राऊंड २ साठी निवड झाली आहे.

**आदर्श शिक्षक पुरस्कार**

सांस्कृतिक कलादर्पण संस्थेच्या वतीने दरवर्षी विविध शाळांच्या गुणवंत शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सत्कार करण्यात येतो. **यावर्षीच्या 'आदर्श शिक्षक पुरस्कारा'साठी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा दिनेश मिसाळ यांची निवड करण्यात आली. सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ यांना सन्मानचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले.** पालक, शिक्षक व संस्थेच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन! तसेच ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या संस्थेच्या विविध स्पर्धेत सहभाग घेऊन घवघवीत यश संपादित केल्याबद्दल शाळेला आदर्श शाळा पुरस्काराने सन्मानित केले.

**आंतरराष्ट्रीय योगासन चॅम्पियन स्पर्धा २०२३ सुयश**

आर्ट ऑफ लर्निंग फांउडेशन, नवराष्ट्र तर्फे चौथी आंतरराष्ट्रीय योगासन चॅम्पियन स्पर्धा २०२३, नेरुळ, नवी मुंबईतील आगरी कोळी भवन येथे संपन्न झाली. या स्पर्धेसाठी आसाम, केरळ, जळगाव, नागपूर, कराड, ठाणे, मुंबई, नवी मुंबईतील अनेक स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत आर्टिस्टिक योगासने, पारंपारिक योगासने करायची होती. पारंपरिक योगा स्पर्धेच्या क गटातून विद्यार्थीनी कु. हर्षदा कंक हिने प्रथम क्रमांक मिळविला. पारंपरिक योगा स्पर्धेच्या क गटातून विद्यार्थीनी कु. हर्षदा कंक हिने प्रथम क्रमांक मिळविला. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी खुल्या गटातून द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. योगगुरु डॉ. रीना अग्रवाल व संस्थेचे पदाधिकारी यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह, मेडल व प्रशस्तिपत्रक देऊन विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

**अभिनंदन वार्ता**

✻ नवी मुंबई महानगरपालिका समाज विकास विभागातर्फे दि. ३ जानेवारी २०२४ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित निबंध लेखन स्पर्धेत शिक्षिका श्रीमती आरती औचर यांनी उत्तेजनार्थ क्रमांक संपादन केला. नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मा. श्री. राजेश नार्वेकर यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक व सन्मानचिन्ह देऊन यांना गौरविण्यात आले.

## पुणे विद्यार्थी गृहाच्या कुलसचिवपदी श्री. दिनेश मिसाळ यांची निवड

पुणे विद्यार्थी गृहाच्या कुलसचिव पदी नेरुळ शाखेचे संचालक श्री. दिनेश मिसाळ यांची निवड झाल्याबद्दल सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, पालक व विद्यार्थी यांच्यातर्फे हार्दिक अभिनंदन!

### कराटे सुयश

Open International Eibukai Cup कराटे चॅंपियनशिपमध्ये इ. ३रीतील विद्यार्थी कु. आर्यन दिलीप यादव याने काता कराटे प्रकारात रजत पदक व कुमिते प्रकारात कांस्य पदक प्राप्त केले.

### लॉन टेनिस सुयश

Blaze Tennis Academy आयोजित Lawn टेनिस टुर्नामेंटमध्ये इ. ५वीतील विद्यार्थी कु. श्लोक किशोर कोकरे याने ट्रॉफी व सेमिफायनलिस्ट चे पदक प्राप्त केले.

### नवनीत चित्रकला स्पर्धा सुयश

नवनीत आयोजित युवा मास्टर स्ट्रोक ऑल इंडिया चित्रकला स्पर्धा २०२३ मध्ये इ. १ली ते ७वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत ब गटातून कु. सोनम घाटविसावे इ. ६वी व क गटातून कु. मयुरेश जाधव इ. ७वी या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

### कॅमल आर्ट चित्रकला स्पर्धा सुयश

कॅमल आर्ट चित्रकला स्पर्धेत इ. १ली ते ७वीच्या एकूण १७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत गट सी मधून इयत्ता ३ री तील कु. आरुष बाबासाहेब कानवडे व इ. ४थीतील कु. अणिक हेमंत पिसे या दोन विद्यार्थ्यांनी पारितोषिक प्राप्त केले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

# विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. राजकुमारी इंदलकर**

### वाणिज्य व विज्ञान प्रदर्शनातील सुयश

